# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२३

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

### पोलीस गृहनिर्माण मंडळामार्फत दिल्या जाणाऱ्या गृह कर्जाची प्रकरणे निकाली काढण्याबाबत

**(१) ४०४५३ (१२-०४-२०२२). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलीस गृहनिर्माण मंडळामार्फत दिल्या जाणाऱ्या गृह कर्जाची हजारो प्रकरणे गत तीन वर्षांपासून प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गृह कर्जाची प्रकरणे सादर करताना मालमत्ता गहाण ठेवून, काही प्रकरणात ११ महिन्यांचा करार करुन सादर केलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरण तातडीने निकाली काढावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २७ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०२३) :** (१) ते (४) महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाने दि.१०/०४/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये घर बांधणी अग्रिम योजना राबविण्याकरीता एकूण रु.९१५.४० कोटी इतके कर्ज उभारणी करुन पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य व पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे मार्फत एकूण ५०१७ पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना घरबांधणी अग्रिम वितरीत केले आहे. सदर गृह कर्जाची प्रकरणे सादर करताना मालमत्ता गहाण ठेवण्यात येते. गृह कर्जाची प्रकरणे तातडीने निकाली काढण्याच्या अनुषंगाने लोकप्रतिनिधींनी मागणी केलेली आहे.

दि.१०/०४/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुरु केलेली योजना दि.०७/०६/२०२२ रोजी रद्द करण्यात आली होती. तथापि दि.१४/१०/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये पुन्हा बँकांमार्फत कर्जव्यवस्था करण्याचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत गृह कर्जाचे प्रलंबित अर्ज निकाली काढण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाच्या रु.१००० कोटीचे नवीन कर्ज उभारणीबाबत बँक ऑफ इंडिया यांच्या प्रस्तावास शासनाने मान्यता दिलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बार्शी (जि.सोलापूर) येथे शेअर मार्केट मध्ये झालेला गैरव्यवहार

**(२) ४३१२० (१२-०४-२०२२). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बार्शी (जि.सोलापूर) येथे झालेल्या शेअर मार्केट मध्ये झालेला गैरव्यहाराबाबत चौकशी करून पोलीस निरीक्षक (श्री.शेळके) यांच्यावर कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री, यांना दिनांक १५ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी प्राप्त तक्रारीवरुन आरोपी क्र. १ विशाल अंबादास फटे, २. राधिका विशाल फटे, ३. अंबादास गणपती फटे, ४. वैभव अंबादास फटे व ५. अलका अंबादास फटे यांच्याविरुध्द बार्शी शहर पोलीस ठाणे येथे गु.र.नं. २७/२०२२ भा.द.वि. कलम-४०९, ४१७, ४२०, ३४ महाराष्ट्र ठेविदारांचा(वित्तीय संस्थामधील हितसंबंधाचे संरक्षण) अधिनियम,१९९९ चे कलम ३ प्रमाणे दि. १४.०१.२०२२ रोजी गुन्हा दाखल केला आहे. यातील आरोपी क्र.१ व ३ हे सध्या न्यायालयीन कोठडीत अटकेत असून आरोपी क्र.४ हा जामिनावर खुला आहे. तसेच आरोपी क्र.२ व ५ यांना मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे.

सदर गुन्हयातील सर्व ५ आरोपीतांविरुध्द दि.१२.०४.२०२२ रोजी सेशन कोर्ट(विशेष न्यायालय)बार्शी येथे दोषारोपपत्र दाखल केले आहे. सद्यस्थितीत सी.आर.पी.सी.१७३(८) प्रमाणे पुरवणी तपास पोलीस उप अधीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, सोलापूर ग्रामीण हे करीत आहेत. तसेच, मा.विधानसभा सदस्य यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने अपर पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांचे स्तरावरुन संबंधित पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना समज देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई पोलिस गुन्हे अन्वेषण विभागासह सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना**
**एक वर्षानंतरही शासकीय देणी न मिळाल्याबाबत**

**(३) ४५१६७ (३१-१०-२०२२). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पोलिस गुन्हे अन्वेषण विभागासह विविध विभागातील अनेक पोलिस अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त होऊन एक वर्ष झाले तरी अद्याप निवृत्तीनंतर मिळणारी शासकीय देणी मिळाली नसल्याचे दिनांक ६ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये हक्काची ग्रॅज्युएटी, निवृत्ती वेतन, रजेचा मोबदला, गट विमा योजना, सातव्या वेतन आयोगाचा दुसरा हप्ता आदी शासकीय देणी मिळणे क्रमप्राप्त असतानाही वर्षभरापासून मिळाली नसल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याबाबत संबंधित सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करुन चौकशी केली असता, त्यांनी नस्ती पुढे पाठविण्यात आली आहे असे सांगण्यात येऊन या नस्ती दोन ते तीन महिने मूळ विभागास परत पाठविल्या जात नसून काहीवेळा त्यांच्या नस्तींमध्ये त्रुटी असल्याचे सांगितले जाऊन टाळाटाळ करण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले, त्यानुसार सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना थकीत असलेली शासकीय देणी अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०२३) :** (१) व (२) माहे जानेवारी २०२१ ते ३१ मे २०२२ या कालावधीत एकूण २२०५ सेवानिवृत्त झालेल्या पोलीस कर्मचा-यांपैकी ७५६ पोलीस कर्मचा-यांना सेवानिवृत्तीवेतन मंजूर करण्यात आले आहे. तसेच १३०३ कर्मचा-यांना तात्पुरते निवृत्तीवेतन, ७९८ कर्मचा-यांना सेवा-नि-उपदान, १०९८- कर्मचाऱ्यांना रजा सममूल्य वेतन, १२९८ कर्मचा-यांना दुसरा हप्ता अदा करण्यात आलेला आहे. उर्वरित देयके सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना सेवापुस्तक पडताळणी अभावी तात्पुरते निवृत्तीवेतन अदा करण्यात आलेले आहे. तसेच संबंधितांनी मागणी केल्यास व त्यांच्या विरुद्ध चौकशी प्रलंबित नसल्यास तात्पुरते उपदानसुद्धा अदा करण्यात आलेले आहे. ७५६ कर्मचा-यांना निवृत्तीवेतन व १३०३ कर्मचा-यांना तात्पुरते निवृत्तीवेतन असे एकूण २०५९ पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना निवृत्ती विषयक लाभ देण्यात आले आहेत.

(४) वित्त विभागाच्या दि.०७/०५/२०२१ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये तात्पुरते निवृत्तीवेतन / कुटुंब निवृत्तीवेतन एक “विशेष बाब” म्हणून मंजुर करण्याची कार्यवाही करण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच वेतन पडताळणीचे काम जलद गतीने करणेकरीता विशेष वेतन पडताळणी पथकाची स्थापना केली आहे.
(५) माहे जानेवारी २०२१ ते ३१ मे २०२२ या कालावधीत एकूण २२०५ सेवानिवृत्त झालेल्या पोलीस कर्मचा-यांपैकी ७५६ कर्मचा-यांना निवृत्तीवेतन व १३०३ कर्मचा-यांना तात्पुरते निवृत्तीवेतन असे एकूण २०५९ पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना निवृत्ती विषयक लाभ देण्यात आले आहेत.

---

## मुंबई पोलीस दलातील सेवानिवृत्त पोलीस कर्मचाऱ्यांना निवृत्ती रक्कम न मिळाल्याबाबत

**(४) ४५५१० (२५-१०-२०२२). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित झनक (रिसोड), अ‍ॅड.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई पोलीस दलातील सेवानिवृत्त झालेल्या अनेक पोलीस कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्काची निवृत्ती रक्कम मिळविण्यासाठी प्रशासनाकडे हेलपाटे घालावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर देय रक्कम व पेन्शन न सुरु झाल्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती बिकट झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात स्वतःच्या हक्काची निवृत्ती रक्कम न मिळाल्यामुळे किमान ३० ते ४० निवृत्त पोलीस कर्मचाऱ्यांचे निधन झाले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०२३) :** (१) ,(२) व (३) मुंबई पोलीस दलातून दि. ३१ जानेवारी २०२० ते ३१ ऑगस्ट २०२२ या कालावधीत एकूण ३९०५ सेवानिवृत्त झालेल्या पोलीस कर्मचा-यांपैकी २९९३ पोलीस कर्मचा-यांना निवृत्तीवेतन देण्यात आले आहे. तसेच ३८७९ कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी मधील रक्कम, ३७५६ कर्मचा-यांना गट विमा योजनेची रक्कम, २९४६ कर्मचाऱ्यांना सेवा-नि- उपदान, २९९३ कर्मचाऱ्यांना रजा सममूल्य वेतन, अदा करण्यात आले आहेत. उर्वरित ९१२ पैकी ८४३ पोलीस कर्मचा-यांची सेवापुस्तके वेतनपडताळणी अभावी प्रलंबित असून ४६ पोलीस कर्मचा-यांची सेवापुस्तके महालेखापाल कार्यालयास पाठविण्यात आलेली आहेत. सदर ९१२ पोलीस कर्मचा-यांना तात्पुरते निवृत्तीवेतन अदा करण्यात येत असून त्यांना भविष्य निर्वाह निधी मधील रक्कम व गट विमा योजनेची रक्कम प्रदान करण्यात आलेली आहे.
(४) मुंबई पोलीस दलातून निवृत्त झालेल्यांना सेवा निवृत्तीवेतन लागू करण्यास होत असलेल्या विलंबाबाबत वेळोवेळी पोलीस उप आयुक्त, मुख्यालय-१ व पोलीस सह आयुक्त, (प्रशासन) यांच्या दालनात आढावा बैठक घेण्यात येते. मुंबई पोलीस आयुक्त कार्यालयाच्या मुख्यालयामार्फत सेवानिवृत्त झालेल्या पोलीस कर्मचास-यांना विनाविलंब सेवानिवृत्ती वेतन लागू होण्याच्या दृष्टीने विशेष वेतन पडताळणी पथक स्थापन करण्यात आले होते. तसेच सध्या वेतन पडताळणी पथक कार्यरत आहे.
(५) कोव्हीड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे, शासनाने दि.२०/०३/२०२० पासून राज्यात लॉकडाऊन जाहिर केल्यामुळे कार्यालयातील उपस्थिती मर्यादित करण्यात आली होती. त्यामुळे वेतनपडताळणी पथकास सादर केलेल्या सेवापुस्तकांची पडताळणी न झाल्यामुळे तसेच महालेखापाल कार्यालयास सादर केलेली प्रकरणेही मंजूर न झाल्यामुळे सदर प्रकरणे प्रलंबित आहेत.

---

**म्हाडाच्या कांही वसाहतीचा पुनर्विकास समूह विकास तत्वावर करण्याचा प्रस्ताव**

**(५) ४९५०३ (२९-०१-२०२३). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाच्या कांही वसाहतीचा पुनर्विकास समूह विकास तत्वावर करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, सदर प्रस्तावामध्ये कोणत्या योजना/प्रकल्प घेण्यात येणार आहेत,
(४) तसेच या विचाराधीन प्रस्तावावर अंमलबजावणी होणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०४-२०२३) :** (१) खरे आहे.
(२) म्हाडा अभिन्यासामध्ये नियोजित पायाभूत सुविधांचा विकास व क्षेत्राचे समुचित नियोजन करणे शक्य व्हावे तसेच म्हाडा वसाहतींचा पुनर्विकास करताना जागतिक दर्जाच्या इमारती व सोई सुविधा निर्माण व्हाव्यात या दृष्टीने बृहन्मुंबईमधील म्हाडाच्या काही अभिन्यासाचा एकत्रित पुनर्विकास करण्याचे प्रस्तावित आहे.
(३), (४) व (५) सदर प्रस्तावांमध्ये प्रायोगिक तत्वावर वांद्रे रिक्लेमेशन, आदर्श नगर वरळी व अभ्युदय नगर काळाचौकी या म्हाडाच्या अभिन्यायासाचा समावेश करण्याचे विचाराधीन आहे.

---

**पुणे शहरातील बंद सदनिकांमध्ये होणाऱ्या चोऱ्या आणि घरफोडीचे वाढते प्रमाण**

**(६) ४९६४५ (२९-०१-२०२३). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरामध्ये माहे ऑगस्ट २०२२ ते ऑक्टोबर २०२२ अखेर घरफोड्यांचे प्रमाण खूप वाढले होते हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक १ ऑगस्ट २०२२ ते ३१ ऑक्टोबर २०२२ या कालावधीत पुणे शहर हद्दीत दाखल झालेल्या घरफोडींच्या गुन्ह्यांचा तपशील काय व याप्रकरणी एकंदरीत किती रकमेचा ऐवज लुटण्यात आला आहे,
(३) असल्यास, शहरात होणाऱ्या घरफोड्यांच्या वाढत्या प्रकारांना आळा घालण्यासाठी शासनाने कोणत्या स्वरुपाची प्रतिबंधात्मक उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०२३) :**(१) व (२) पोलीस आयुक्तालय, पुणे शहर कार्यक्षेत्रात दि. ०१ ऑगस्ट २०२२ ते ३१ ऑक्टोबर २०२२ या कालावधीत घरफोडीचे एकुण १२९ गुन्हे दाखल असुन त्यापैकी ७२ गुन्हे उघडकीस आलेले आहेत. त्यामध्ये १३६ आरोपींना अटक करण्यात आली असुन एकूण रु. ३,३१,६२,७६०/- इतक्या रकमेच्या गेलेल्या ऐवजापैकी रु. १,०४,८८,५६८/- इतका मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.
(३) शहरात होणाऱ्या घरफोड्यांच्या वाढत्या प्रकारांना आळा घालण्यासाठी खालील प्रमाणे प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येतात :
१. प्रत्येकी पोलीस स्टेशनच्या हद्दीत ठिकाणे व वेळ बदलुन नाकाबंदी आयोजित करण्यात येत असून झोपडपट्टी भागात कोंबीग करुन तसेच हद्दीतील हॉटेल, लॉजेस, ढाबे व सार्वजनिक ठिकाणी संशयित इसमांचा शोध घेण्यात येत आहे.
२. घरफोडी, चोरीच्या गुन्ह्यातील मागील पाच वर्षातील रेकॉर्डवरील आरोपींना चेक करुन त्यांचेकडे कसोशीने तपास करण्यात येतो व त्यांच्या हालचालीवर बारकाईने लक्ष देण्यात येते. जे गुन्हेगार नजरेआड झालेले आहेत, ते अन्य कोणत्या ठिकाणी रहावयास गेले आहेत, याची पडताळणी करण्यात येते.

३. चोरीचा माल घेणारे, गहाण ठेवून कर्ज देणारे व्यापारी, सोने चांदी आटवुन व्यवसाय करणारे व्यापारी यांचेवर बारीक लक्ष ठेवून त्यांचेकडे कोणी चोरीचा माल विक्री करण्यास जातो अगर कसे यावर टेहळणी करुन त्याबाबत माहिती काढण्यात येत आहे.
४. तडीपार करुन बाहेर वास्तव्यास पाठविलेले व बाहेरुन तडीपार होऊन पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात वास्तव्यात आलेल्या गुन्हेगारांवर विशेष लक्ष देवुन वॉरंट बजावणी करण्यात येते.
५. मालमत्तेच्या गुन्ह्यातील कोर्टात हजर न  होणा-या गुन्हेगारांच्या बाबतीत विशेष लक्ष देऊन वॉरंट बजावण्यात येते.
६. हद्दीतील नवीन कामगार वस्तीतील कामगारांची माहिती घेण्यात येते.
७. नागरीकांना त्यांचे घर, प्लॉट, दुकान इत्यादी ठिकाणी जागोजागी इलेक्ट्रॉनिक सिक्युरीटी सिस्टीम व सीसीटीव्ही कॅमेरे बसवुन घेण्याबाबत प्रोत्साहित केले जाते. बाधीत परिसर निश्चीत करुन तेथे पोहचणारे प्रमुख रस्ते/गल्ल्या/नाके यावर नागरिकांच्या सहभागातून सीसीटीव्ही कॅमेरे बसण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या अहवालानुसार राज्यातील वृध्द नागरीक सर्वाधिक असुरक्षित असल्याबाबत**

**(७) ४९७४० (२४-०१-२०२३). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.नितेश राणे (कणकवली), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या अहवालानुसार राज्यातील वृध्द नागरीक सर्वाधिक असुरक्षित असल्याचे माहे सप्टेंबर २०२२ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,  गेल्या वर्षाच्या आकडेवारीनुसार संपूर्ण राज्यात वृध्दांवरील अत्याचाराचे ६ हजार १९० गुन्हे नोंद झाले असून मुंबईमध्ये वृध्दांवरील अत्याचाराचे एकुण ९८७ गुन्हयांची नोंद आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,  याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती राज्यातील वृध्दनागरीकच्या सुरक्षिततेबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०२३) :** (१) नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो, नवी दिल्ली मार्फत ऑगस्ट, २०२२ मध्ये प्रकाशित केलेल्या “Crime in India-२०२१” या अहवालानुसार, देशातील इतर राज्ये आणि केंद्र शासित प्रदेशांच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यात वृद्ध नागरिकांविरुद्धच्या नोंदीत गुन्ह्यांची सर्वाधिक संख्या आहे. तथापि, गुन्ह्याच्या दरानुसार इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र पाचव्या क्रमांकावर आहे.
(२) होय.
(३) राज्यातील वृध्द नागरीकांच्या सुरक्षिततेबाबत पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत :-
१. ज्येष्ठ नागरिकांच्या तक्रारीचे त्वरीत निवारण करण्याच्या सूचना पोलीस स्टेशन प्रमुखांना देण्यात आल्या असून प्रत्येक पोलीस स्टेशन स्तरावर ज्येष्ठ नागरिक सेल स्थापन करण्यात आले आहेत.
२. प्रत्येक पोलीस ठाणेच्या हद्दीत वृध्दांच्या मदतीसाठी ज्येष्ठ नागरिक सहायता कक्ष स्थापन केला आहे, ज्येष्ठ नागरिकांना पोलीस प्रशासनाकडून त्वरीत  मदत व्हावी याकरिता सातत्याने कारवाई व उपाय योजना केलेल्या आहेत.
३. एकटे राहणाऱ्या जेष्ठ नागरिकांच्या घरी भेटी देऊन त्यांच्या अडीअडचणींची विचारपुस करुन त्यांना मानसिक आधार देण्यात येतो.
४. डायल ११२, तसेच १०९० हेल्पलाईनवर जेष्ठ नागरिक यांना तात्काळ मदत पुरविण्यात येते. घटकात वृध्दांवरील अत्याचाराबाबत कोणताही गुन्हा घडुन आल्यास त्यांना सन्मानपुर्वक वागणुक देऊन तात्काळ कार्यवाही केली जाते.
५. कम्युनिटी पोलीसींग योजना, जेष्ठ नागरिक कक्ष, जेष्ठ नागरिक नावांची नोंदणी रजिस्टर, इ. योजना घटकातील काही पोलीस ठाणे स्तरावर राबविण्यात येतात.

६.जेष्ठ नागरिक अर्जदार व गैरअर्जदार यांचे समुपदेशन करुन त्यांना आवश्यक मार्गदर्शन केले जाते तसेच काही पोलीस घटकात ज्येष्ठ नागरिकांचे व्हाट्सअॅप ग्रुप तयार करण्यात आले असून त्याद्वारे त्यांची विचारपुस करुन त्यांना मानसिक आधार देण्यात येतो.
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## पुणे शहरात वाढते मोबाईल चोरीचे, मारहाण व लुटमारीच्या गुन्ह्यात होत असलेली वाढ

**(८) ४९७९० (२४-०१-२०२३). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहर परिसरातील हनुमान टेकडी, वेताळ टेकडी, तळजाई टेकडी, म्हातोबा टेकडी आणि तत्सम ठिकाणी सकाळ व संध्याकाळी फिरायला जाणाऱ्या नागरिकांवर हल्ले करून त्यांना मारहाण आणि लुटमार करण्याच्या प्रकारांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सणासुदीच्या काळात माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०२२ मध्ये पुणे शहरात मोबाई चोरीचे प्रकार मोठ्या प्रमाणात घडत असल्याचे निदर्शनास आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुणे शहर पोलीसाकडे दिनांक १ जानेवारी २०२२ ते १० नोव्हेंबर २०२२ अखेर मोबाईल चोरीचे तसेच मारहाण व लुटमार करण्यात आलेल्या किती गुन्ह्यांची नोंद पोलिसांकडे करण्यात आली त्याचा तपशील काय आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी गुन्हेगारांना पकडून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यासाठी शासनाने कोणत्या स्वरुपाची कार्यावाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास,अशाप्रकारच्या मोबाई चोरी, मारहाण आणि लुटमारीच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी शासनामार्फत कोणत्या स्वरुपाची उपापयोजना करण्यात आली अथवा येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०२३) :**(१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) पोलीस आयुक्तालय, पुणे शहर कार्यक्षेत्रामध्ये १ जानेवारी २०२२ ते १० नोव्हेंबर २०२२ या कालावधीत मोबाईल चोरीचे एकुण ३६९ गुन्हे तसेच मारहाण व लुटमारीचे एकुण २६९ असे एकुण ६३८ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. सदर गुन्ह्यांमधील एकुण ६६१ आरोपींना अटक करण्यात आली आहे.
(५) मोबाईल चोरी, मारहाण आणि लुटमारीच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी प्रत्येकी पोलीस स्टेशनच्या हद्दीत ठिकाणे व वेळ बदलुन नाकाबंदी आयोजित करणे, झोपडपट्टी भागात कोंबीग करुन तसेच हद्दीतील हॉटेल, लॉजेस, ढाबे व सार्वजनिक ठिकाणी संशयित इसमांचा शोध घेणे, तडीपार करुन बाहेर वास्तव्यास पाठविलेले व बाहेरुन तडीपार होवुन पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात वास्तव्यात आलेल्या गुन्हेगारांवर विशेष लक्ष देवुन वॉरंट बजावणी करणे, नागरीकांना त्यांचे घर, प्लॉट, दुकान इत्यादी ठिकाणी जागोजागी इलेक्ट्रॉनिक सिक्युरीटी सिस्टीम व सीसीटीव्ही कॅमेरे बसवुन घेण्याबाबत उद्युक्त करणे इ. अशा प्रकारे प्रतिबंधात्मक कायदेशीर उपाय करण्यात येत आहेत.

---

## एटीएम मशीनच्या डीस्पेन्सरमधून लाखो रुपयांची चोरी करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीला नागपूर येथे अटककेल्याबाबत

**(९) ५०११८ (२४-०१-२०२३). श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एटीएम मशीनच्या डीस्पेन्सरमधून लाखो रुपयांचीचोरी करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीला दिनांक २९ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास नागपूर येथे अटक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शाासनाने चौकशी केली आली आहे काय,
(३) असल्यास, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधिताविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०२३) :**(१) व (२) होय.

(३) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आलेली असून नागपुर शहर आयुक्तालयातील विविध सात पोलीस ठाण्यात भा.दं.वि. कलम ३८०, ४२७ व ३४ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सदर सात गुन्हयांमध्ये तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच, आरोपींकडून एकूण रु. ६७,३००/- नगदी रक्कम व रु. २५८००/- किंमतीचा माल हस्तगत करण्यात आला आहे. सदर सात गुन्हयांपैकी पाच गुन्हयांमध्ये मा. न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आलेले असुन उर्वरित दोन गुन्हे सध्या पोलीस तपासावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आडस व वाघाळा ( जि. बीड)येथील नवीन १३२/३३ केव्ही उपकेंद्राच्या प्रस्तावाबाबत**

**(१०) ५०९९३ (१७-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आडस, (ता. केज, जि. बीड) येथे नवीन १३२/३३ केव्ही उपकेंद्राचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता, महावितरण, अंबाजोगाई. यांनी मंजुरी साठी दिनांक. २४ जून, २०२२ रोजी अधीक्षक अभियंता, महावितरण, बीड. यांच्याकडे सादर केला आहे. हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाघाळा, (ता. अंबाजोगाई, जि. बीड) येथे नवीन १३२/३३ केव्ही उपकेंद्राचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता, महावितरण, अंबाजोगाई. यांनी मंजुरी साठी दिनांक ०५ जुलै, २०२२ रोजी अधीक्षक अभियंता, महावितरण, बीड. यांच्याकडे सादर केला आहे. हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वरील दोन्ही केंद्रांचे राज्य पारेषण उपक्रमाच्या २०२२-२३ ते २०२६-२७ या पंचवार्षिक आराखडयात समाविष्ट करण्यात यावा व त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देऊन काम सुरु करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी प्रधान सचिव, उर्जा विभाग, मुंबई.यांच्याकडे दिनांक १५ जुलै, २०२२ रोजी वा त्यासुमारस निवेदनाद्वारे केली होती. हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वरील प्रकरणी शासनाने चौकशी करून वरील उपकेंद्राचा समावेश पंचवार्षिक आराखडयात करण्यात येऊन उपकेंद्राला निधी उपलब्ध करुन देण्याच्यादृष्टिने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०५-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे

(३) होय हे खरे आहे.

(४) महावितरण कंपनीने बीड जिल्हयात दोन नवीन १३२/३३ केव्ही सारुळ आणि लाडझरी उपकेंद्रांच्या तांत्रिक प्रस्तावांच्या मंजुरीची प्रक्रिया पुर्ण करुन प्रस्ताव महापारेषण कंपनीस सादर केला होता. महापारेषण कंपनीच्या संचालक मंडळाने दिनांक १७.१०.२०२२ रोजीच्या बैठकीत सारुळ अति उच्च दाब उपकेंद्राच्या प्रस्तावाला मान्यता दिली आहे.

तसेच लाडझरी उपकेंद्राचा प्रस्ताव महापारेषणच्या क्षेत्रिय कार्यालयाकडून उपकेंद्राचा तांत्रिक सुसाध्यता अहवाल (Technical Feasibility Report) महापारेषण कंपनीस प्राप्त झाला आहे. सदरचा अहवाल राज्य महापारेषण उपक्रमातर्फे प्रणाली अभ्यास पुर्ण करुन महापारेषणच्या योजना विभागास पुढील कार्यवाहीसाठी पाठविला आहे.

त्यामुळे सद्यस्थितीत बीड जिल्हयात कार्यान्वित २२०/१३२/३३ केव्ही गिरवली आणि १३२/३३ केव्ही केज अतिउच्चदाब उपकेंद्रांवरील भार अनुक्रमे १० व १५ एमव्हीए इतका कमी होणार आहे. तसेच सुधारित वितरण क्षेत्र योजनेअंतर्गत करण्यात येणाऱ्या उपाययोजनांमुळे बीड जिल्ह्यातील केज व अंबेजोगाई तालुक्यातील वीज ग्राहकांना योग्य दाबाने व सुरळीतपणे वीज पुरवठा करणे शक्य होणार आहे. सबब, आडस व वाघाळा (ता.अंबेजोगाई जि. बीड) येथे नवीन १३२/३३ केव्ही उपकेंद्रांची तातडीने उभारणी करण्याची आवश्यकता नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बुलढाणा जिल्हयातील नांदुरा शहरापासून जवळ असलेल्या डागा पेट्रोल पंपावर पेट्रोल ऐवजी पाण्याची विक्री करीत असल्याबाबत

**(११) ५१२७६ (१७-०१-२०२३). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) शहरापासून नांदूरा भागात १ कि.मी. अंतरावरील डागा पेट्रोल पंपावर पेट्रोल ऐवजी पाण्याची विक्री करीत असल्याची बाब दि.१४ सप्टेंबर, २०२२ रोजी पर त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) तसेच यापूर्वीही अनेक वेळा असे प्रकार उघडकीस आल्यावर संबधितांकडे तक्रार करुन देखील संबधित पेट्रोल पंप धारकांवर कोणतीच कारवाई केली नाही हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पेट्रोल पंप मालकांना पाठीशी घालणा-या शासकीय अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.
बुलढ़ाणा जिल्ह्यातील नांदूरा शहरापासून जवळ असलेल्या डागा पेट्रोल पंपावर पेट्रोल ऐवजी पाण्याची विक्री करीत असल्याबाबत पोलीस स्टेशन नांदूरा येथे एकही तक्रार/गुन्हा दाखल नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अमरावती शहरात शासकीय तांदळाचा अपहार होत असल्याबाबत

**(१२) ५१२९८ (१८-०१-२०२३). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती शहरात दुस-यांदा शासकीय तांदळाचा अपहार करणारा ट्रक अमरावती येथील गाडगेनगर पोलिसांनी दिनांक१७ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास पकडला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आठ दिवसात दोन ट्रक तांदूळ पोलिसांनी पकडला असुन दोन्ही ट्रकमधील जप्त तांदूळ खरेदी विक्रीच्या पावत्या ट्रकचालक/ मालकांकडे उपलब्ध नसल्याने शासनाने त्वरीत चौकशी करुन दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ,

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०२३) :** (१) होय.
(२) सदर दोन्ही प्रकरणी ट्रक चालक/मालक यांच्याविरुद्ध भा.दं.वि. कलम ४२०,३७९,३४ सह जीवनावश्यक वस्तू अधिनियम कलम ३, ७ अन्वये गुन्हे दखल करण्यात आले आहेत. त्यापैकी दिनांक ११.०९.२०२२ रोजी दाखल अप.क्रं. १०६४/२०२२ मध्ये मुद्देमाल हस्तगत करून ४ आरोपींविरुद गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तर दिनांक १५.०९.२०२२ रोजी दाखल अप.क्रं. १०८७/२०२२ मध्ये मुद्देमाल हस्तगत करून २ आरोपींविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बुलढाणा जिल्हयातील मलकापूर ते खामगांव , मेहकर ते सिंदखेडराजा या मार्गावर बायोडिझेलच्या नावाखाली इंडस्ट्रियल ऑईलची विक्री होत असल्याबाबत

**(१३) ५१३३२ (१८-०१-२०२३). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील मलकापूर ते खामगांव, मेहकर ते सिंदखेडराजा या मार्गावर बायोडिझेलच्या नावाखाली

इंडस्ट्रियल ऑईलची विक्री होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ रोजीच्या सुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.
बायोडिझेलच्या नावाखाली इंडस्ट्रीयल ऑईलची विक्री होत असल्याबाबत सन २०२२ मध्ये बुलढाणा जिल्ह्यामध्ये एकही तक्रार/गुन्हा दाखल नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात नवी मुंबई पोलिसांना वापरासाठी असलेल्या शासकीय वाहनांच्या डिझेल बिलात अनियमितता झाली असल्याबाबत

**(१४) ५२६७० (१८-०१-२०२३). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई पोलिसांना वापरासाठी असलेल्या शासकीय वाहनांच्या डिझेल देयकात अनियमितता झाली असल्याचे माहे सप्टेंबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, या प्रकरणी मुख्यालय उपायुक्तांमार्फत चौकशी करण्यात येत असून वापर झालेल्या डिझेलच्या देयकाची तपासणी केली जात आहे, हे ही खरे आहे ,
(३) असल्यास, सदर चौकशी अहवालानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०२३) :**(१) होय.
सदर प्रकरणी पोलीस ठाणे, कळंबोली येथे एका चालक पोलीस शिपाई व इतर आरोपींविरुद्ध गु.र.नं. २१४/२०२२ मध्ये भा.दं.वि.का.क. ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून तपासाधीन आहे.
(२) सदर प्रकरणात सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), नवी मुंबई यांनी प्राथमिक चौकशी केली आहे.
(३) सदर प्राथमिक चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळून आलेले चालक पोलीस शिपाई यांना सेवेतून निलंबित करण्यात आले असून त्यांचे विरूध्द विभागीय चौकशी आदेशित करण्याची कार्यवाही चालु आहे. अन्य संबंधितांवर शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खडकपूर्णा प्रकल्पास सुप्रमा मिळणे बाबत

**(१५) ५२८३० (१८-०१-२०२३). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खडकपूर्णा प्रकल्पास सुप्रमा मिळावी यासाठी माहे, सप्टेंबर २०२१ पासून रुपये १५७४ कोटीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात राज्य तांत्रिक सल्लागार समितीकडून छाननी होऊन दिनांक २२ ऑगस्ट २०२२ रोजी त्रीसदस्यीय समितीची बैठक होऊन प्रस्ताव नियामक मंडळात ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर सुप्रमा मध्ये प्रस्तावित करण्यात आलेली कामे हे कालवे व सिंचनाशी निगडित असल्याने मान्यता प्राप्त झाल्याशिवाय कामे हाती घेता येत नाही त्यामुळे खडकपूर्णा प्रकल्पाच्या सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांचेकडे दिनांक २२ ऑगस्ट, २०२२ वा त्या सुमारास लेखी स्वरूपात केली आहे हे खरे आहे,
(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०४-२०२३) :** (१) हे खरे नाही,

खडकपूर्णा प्रकल्पाचा रु.१५३१.४१ कोटीचा पंचम सुप्रमा प्रस्ताव नियामक मंडळास सादर करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगती पथावर आहे.
(२) हे खरे आहे,
(३) हे खरे आहे,
(४) खडकपूर्णा प्रकल्प, ता.देऊळगांव राजा ,जि. बुलडाणा या प्रकल्पाच्या पंचम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्ताव अ.मु.स (वित्त), वित्त विभाग यांचे अध्यक्षतेखाली दि.२२.०८.२०२२ रोजी झालेल्या सचिव स्तरावरील उप समितीच्या मंत्रालयीन बैठकीच्या इतिवृत्तात दिलेल्या निर्देशानुसार पुढील निर्णयार्थ व्यय अगक्रम समितीस सादर करण्यासाठी नियामक मंडळास शिफारस करण्यात आली आहे . त्यानुषंगाने सदर प्रकल्पाचा पंचम सुधारीत प्रशासकीय मान्यता किंमत रु.१५३१.४१ कोटीचा प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता झाल्यानंतर व्यय अग्रक्रम समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्ह्यातील १६५ गावपाडे मुख्य रस्त्याशी जोडली नसल्याबाबत**

**(१६) ५२९३९ (२१-०१-२०२३). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील १६५ गावपाडे मुख्य रस्त्याशी जोडली नसल्यामुळे ग्रामपंचायत ऐना येथील मनमोहाडी गावातील गरोदर महिलेला ५ किलोमिटर डोली करुन रुग्णालयापर्यंत पोहचण्यापूर्वी जंगलात प्रसूती करावी लागली तसेच विद्यार्थ्यांनाही शाळेच्या ठिकाणी पोहचण्यास अडचणी निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जिल्हायातील ग्रामीण भागात अशा घटना वारंवार घडत असतांनाही अशा दुर्गम भागातील रस्ते मुख्य रस्त्यांना जोडण्याकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने उक्त गावपाडे मुख्य रस्त्यांशी जोडून दळणवळणाची सुविधा त्वरीत उपलब्ध होण्यायाकरीता शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (०१-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

राज्य मार्ग क्र. ७७ ते मनमोहाडी रस्ता (२.५०० कि.मी. लांबी) या रस्त्याच्या कामास मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना पालघर यांच्याकडून कार्यवाही सुरु आहे.

तसेच, राज्यातील सर्व आदिवासी वाडे/पाडे, आश्रमशाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र बारामाही रस्त्याने जोडण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी जिल्ह्यातील सेलू तालुक्यातील निम्न दुधना प्रकल्पासाठी भूसंपादन करण्याबाबत**

**(१७) ५३५०१ (२२-०१-२०२३). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील (ता सेलू, जि.परभणी) येथील सर्वात मोठा प्रकल्प म्हणून ओळखल्या जाणाऱ्या निम्न दुग्ध प्रकल्पाचे अद्यापही शेकडो हेक्टरचे भूसंपदान झाले नसल्याने धरण पूर्ण क्षमतेने भरण्यास अडचणी येत असल्याचे माहे नोव्हेंबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धरणाची साठवण क्षमता ३४४.८०० दशलक्ष घनमीटर एवढी आहे. तथापि भूसंपादन पूर्णत्वास गेले नसल्याने धरणात २४२.२०० लघमी जलसाठा होऊन उर्वरित शेकडो दलघमी पाण्याचा विसर्ग नदी पात्रात करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,सदर धरणाच्या भूसंपादनाची तातडीने कारवाई करुन शेतकऱ्यांच्या सिंचनाचा प्रश्न कायमस्वरुपी सोडविण्याची स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे मागणी केली आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार भूसंपादनाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०४-२०२३) :** (१) हे खरे आहे,

प्रकल्पाच्या जलाशयातील पाणी बुडीत क्षेत्राच्या असंपादित क्षेत्रात जात असल्याने नियामक मंडळाचा ठराव क्र.८०/११नुसार सन २०२२ च्या पावसाळ्यात ७५% पाणी साठा मर्यादित ठेवण्यास नियामक मंडळाने मान्यता दिली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) बुडीत क्षेत्राच्या असंपादित क्षेत्राचे भूसंपादनाची कार्यवाही जलसंपदा व महसुल विभागामार्फत प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तिवसा (जि.अमरावती) येथील गुरुकुंज उपसा सिंचन योजनेबाबत**

**(१८) ५५०८८ (२२-०१-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिवसा (जि.अमरावती) येथील गुरुकुंज उपसा सिंचन योजना तिवसा अंतर्गत २२ गावांमधील ७१०९ लाभ क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळणार असून तेथील स्थापत्य यांत्रिकी व विदयुत विषयक कामे पूर्ण झालेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रायोगिक तत्त्वावरील गुरुकुंज उपसा सिंचन योजना करिता सौर ऊर्जा आराखड्यास मंजुरी मिळावी यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २७ सप्टेंबर २०२२ रोजी मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास,उक्त निवेदनाच्या अनुषंगाने प्रायोगिक तत्त्वावरील आराखड्यास मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२३) :** (१) होय, तिवसा (जि.अमरावती) येथील गुरुकुंज उपसा सिंचन योजना तिवसा, जिल्हा अमरावती या योजनेचे स्थापत्य, यांत्रिकी व विदयुत विषयक कामे जून, २०२२ अखेर पूर्ण झालेली असून सन २०२२-२३ च्या रब्बी हंगामातील सिंचन सुरु आहे.
(२) हे अशंत: खरे आहे, ॲड. यशोमती ठाकूर, मा. विधानसभा सदस्य यांनी दिनांक २७/०७/२०२२ रोजी अधिक्षक अभियंता, उर्ध्व वर्धा प्रकल्प मंडळ, अमरावती यांना निवेदन दिले आहे.
(३) महाराष्ट्रातील उपसा सिंचन योजनांकरीता सौर उर्जेद्वारे विद्युत पुरवठा करण्यासंदर्भात धोरण तयार करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे. सदर धोरण निश्चीत झाल्यानंतर सदर निवेदनातील सुचनेनुसार पुढील कार्यवाही करणे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## युसुफवडगाव (ता. केज, जि. बीड) येथील पोलसांसाठी असलेले शासकीय निवासस्थान व पोलीसस्टेशनची झालेली दूरवस्था

**(१९) ५५१५५ (२९-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) युसुफवडगाव (ता. केज, जि. बीड) येथील पोलीसांसाठी असलेल्या शासकीय निवासस्थानाची तसेच पोलीस स्टेशनची दूरवस्था झाली असल्याने धोकादायक बनले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पोलीसांसाठी नवीन शासकीय वसाहत व पोलीस स्टेशन बांधकामाला मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी गृह मंत्री यांचेकडे दि. २६ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेख निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअंनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०३-२०२३) :**(१) व (२) होय
(३) राज्यातील १८७ पोलीस स्टेशन व निवासस्थान, ३०५ सेवा निवासस्थान आणि ४६ इतर प्रशासकीय इमारत बांधकामास दि.०७.०२.२०२३ अन्वये शासनाने प्राधान्यक्रम यादीस मान्यता दिलेली आहे. सदर यादीमध्ये बीड येथील पोलीस स्टेशन, युसुफवडगांव करिता नवीन प्रशासकीय इमारत व पोलीस अधिकारी आणि कर्मचारी करिता ४२ सेवा निवासस्थानाचा समावेश करण्यात आलेला आहे. निधी उपलब्धतेनुसार पुढील कार्यवाही महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण महामंडळ मर्या,यांचेकडून सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक शहरातील रोलेट गेम चालकांवर गुन्हा दाखल करण्याबाबत

**(२०) ५५१६१ (२४-०१-२०२३). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहरातील रोलेट गेम मुळे अनेक तरुणांना आत्महत्या करायला लागलेले असून गेमच्या माध्यमातून युवकांची फसवणूक होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, श्री नंदकिशोर वाघ यांची आर्थिक फसवणूक केले बाबत गुन्हा दाखल करून रोलेट गेम चालकांवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १२ सप्टेंबर,२२ रोजी मुख्यमंत्री यांच्याकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी कारवाई करण्याचे आदेश मा.उपमुख्यमंत्री यांनी ईमेल क्रमांक ५४५१८८६८ या अन्वये पोलीस आयुक्त, नाशिक यांना दिलेले असतानाही दोन महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील रोलेट गेम चालकावर गुन्हा दाखल झालेला नाही किंवा कारवाई देखील झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४)असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन रोलेट गेम चालकांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०२-२०२३) :**(१) रोलेट गेम मुळे नाशिक शहरात आत्महत्येची घटना घडलेली नाही. तथापि, फसवणूकीच्या घटनेच्या अनुषंगाने गुन्हे दाखल आहेत.
(२) याबाबत स्थनिक लोकप्रतिनिधी यांनी उप मुख्यमंत्री कार्यालयाकडे निवेदन दिले होते.
(३) व (४) श्री. नंदकिशोर वाघ यांच्या यापूर्वीच्या दिनांक ३१.०३.२०२१ रोजीच्या तक्रारीच्या अनुषंगाने गंगापूर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.१०८/२०२१, महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम १८८७ चे कलम १२ अ नुसार गुन्हा नोंद आहे.
श्री. वाघ यांच्या दिनांक १२.०९.२०२२ रोजीच्या तक्रार अर्जाचा विषय रोलेट जुगारातून आर्थिक फसवणूक झाल्याबाबतच असल्याने यापूर्वीच्या गुन्ह्यात सदर गुन्ह्याचा समावेश करण्यात आला असून भा.दं.वि. कलम ४०६, ४२०, ४३४, ३४ व महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम कलम ४, ५ ची वाढ करण्यात आली आहे.
सदर प्रकरणातील एकुण ४ आरोपी यांना अटक करण्यात आली असून सदर प्रकरणाचा पुढील तपास सुरु आहे.
(५) विलंब झालेला नाही.

---

**पिंपरी चिंचवड (जि.पुणे) शहरातील रागा पॅलेस, काळेवाडी येथील**
**विवाह समारंभामध्ये चोऱ्यांच्या प्रमाणात वाढ होत असल्याबाबत**

**(२१) ५५१९९ (२४-०१-२०२३). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी चिंचवड (जि.पुणे) शहरातील रागा पॅलेस, काळेवाडी येथील एका विवाह समारंभात मोबाईल, चांदीचे दागिने आणि रोकड असलेली पर्स अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना दिनांक २० नोव्हेंबर, २०२२ रोजी रात्री घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास अज्ञात चोरट्याच्या विरोधात चोरीच्या घटनेची व्हिडिओ क्लिप देऊन वाकड पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चोऱ्याला पकडण्यासंदर्भात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०२३) :**(१) होय.
(२) होय.
सदर प्रकरणी पोलीस ठाणे, वाकड (जि. पुणे) येथे दिनांक २०.११.२०२२ रोजी गु. र. नं. ९८०/२०२२ भा. द. वि. क. ३७९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(३) सदर घटनेच्या अनुषंगाने सीसीटीव्ही फुटेज पडताळणी केली असून संबंधीत साक्षीदारांचे जबाब घेण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अनुसूचित जमातीचे खोटे प्रमाणपत्र सादर करुन प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ, गडचिरोली यांनी केलेला गैरव्यवहार**

**(२२) ५५२३३ (१८-०१-२०२३). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रादेशिक व्यवस्थापक,आदिवासी विकास महामंडळ,गडचिरोली यांची नियुक्ती अनुसूचित जमाती मधून झालेली असून त्यांनी ६ वर्षापासून जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,जात पडताळणी समिती, किनवट यांनी दिलेल्या निकालानसार प्रादेशिक व्यवस्थापक यांनी शासकी अभिलेख्यांमध्ये जातीच्या नोंदणीमध्ये फेरफार केल्यामुळे त्यांचे जातीचे प्रमाणपत्र अवैद्य ठरविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाचे स्पष्ट निर्देश असतांनाही व शासन स्तरावर कार्यवाही करण्यासंदर्भात वारंवार पत्र व्यवहार करुनही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. विजयकुमार गावीत (२२-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद विभाग,किनवट यांनी दि.१३.१०.२०२२ रोजीच्या आदेशान्वये श्री गजानन कोटलावार यांचे जात प्रमाणपत्र रद्द केले आहे. त्याविरूध्द श्री गजानन कोटलावार यांनी मा.उच्च न्यायालय,खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका दाखल केली आहे.

सदर याचिकेमध्ये मा.उच्च न्यायालयाने श्री गजानन कोटलावार यांची सेवा समाप्त न करणेबाबत आदेश पारित केलेले आहेत.सद्यस्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रा.पातोंडा,( ता.अमळनेर, जि.जळगांव) येथील येथील एका शेतकऱ्याच्या बैलाचा डिपीच्या तारांचा स्पर्श झाल्यामुळे झालेला मृत्यु**

**(२३) ५५३६६ (२०-०१-२०२३). श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रा.पातोंडा, (ता.अमळनेर, जि.जळगांव) येथे श्री. भगवान हिंमत पाटील, यांचा बैल दिनांक २३ जून,२०२२ रोजी वा त्यासुमारास जळोद शिवारतील शेतातील डिपीच्या तारांचा स्पर्श झाल्यामुळे मृत्यु झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेचा पंचनामा तलाठी, जळोद, सरपंच ग्रामपंचायत पातोंडा व पशुवैद्यकिय अधिकारी, पातोंडा यांनी शवविच्छेदन केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शवविच्छेदन अहवालात बैलाचा मृत्यू हा इलेक्ट्रीक शॉक लागून झाला आहे असे नमूद असतांनाही संबधित शेतक-याला नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संबधित शेतक-यांस नुकसान भरपाई रक्कम त्वरित अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०२३) :** (१) हे खरे आहे.

दिनांक २३ जून, २०२२ रोजी श्री. भगवान हिंमत पाटील, रा. पातोंडा, ता. अमळनेर, जि. जळगाव यांच्या मालकीच्या बैलास जळोद शिवारातील रोहित्राच्या विद्युत भारीत ताणाचे संपर्कात आल्याने प्राणांतिक विद्युत अपघात घडला.

(२) हे खरे आहे.

(३) श्री. भगवान हिंमत पाटील यांना सदर अपघात प्रकरणी नुकसान भरपाई प्रस्ताव तयार करण्यासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे महावितरण कार्यालयास सादर करणेबाबत कळविण्यात आले आहे. सदर कागदपत्रे प्राप्त होताच नुकसान भरपाई रक्कम अदा करण्याचे नियोजित आहे.
(४)श्री. भगवान हिंमत पाटील यांना सदर अपघात प्रकरणी नुकसान भरपाई प्रस्ताव मंजूरीसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे महावितरण कार्यालयास सादर करणेबाबत महावितरण कंपनीने दिनांक ०८.०८.२०२२, दिनांक २७.०९.२०२२ व दिनांक ०९.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. परंतु अद्यापही नुकसान भरपाई प्रस्ताव मंजूरीसाठी आवश्यक असलेली काही कागदपत्रे महावितरणला प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही नियोजित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगांव जिल्हयातील नदीजोड कामांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबत

**(२४) ५५५३८ (२२-०१-२०२३). श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हा वार्षिक योजना ( सर्वसाधारण) अंतर्गत जळगांव जिल्हयातील नदीजोड कामांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबत कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव यांनी दिनांक ८ सप्टेंबर, २०२२ रोजी सचिव (लाभक्षेत्र विकास) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई यांना पत्र सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या पत्रानुसार शासनाने सदरील नदी जोड कामांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे काय, असल्यास त्यांचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०२-२०२३) :** (१) होय.
(२) होय, जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत जळगाव जिल्हयातील एकुण १० नदीजोड योजना सुधारीत प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या आहेत. या १० योजनापैंकी ०७ योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही प्रगतीपथावर असून उर्वरित ०३ सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावांची छाननी प्रगतीत आहे.
(३) विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## मंगळवेढा (जि.सोलापूर )येथून छत्तीसगडमधील मजुराच्या एका अल्पवयीन मुलाला पळवून नेल्याबाबत

**(२५) ५५५४१ (२५-०१-२०२३). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा येथून छत्तीसगडमधील मजुराच्या एका ४ वर्षीय अल्पवयीन मुलाला पळवून नेल्याप्रकरणी अज्ञात व्यक्तीवर गुन्हा दाखल केल्याचे माहे नोव्हेंबर २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तक्रार नोंदवल्यानंतर २४ तास उलटूनही तपास लागला नसून पोलिसांच्या श्वान पथकाने दिवसभर शोध घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शहरात अनेक अवैध धंदे वाढले असून पोलिस उपवभागीय अधिकारी, मंगळवेढा - सांगोला यांच्या अकार्यक्षमतेमुळे शहरातील कायदा व सुव्यस्थेचा प्रश्न निर्माण झाला असून शहरात गुन्हेगारी, अवैध धंदे व अपहरणाचे प्रकार वाढले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय निष्पन्न झाले, अद्यापही मुलाचा शोध न लागण्याची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०२-२०२३) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी प्राप्त तक्रारीवरुन पोलीस स्टेशन मंगळवेढा येथे गु.र.नं.८९१/२०२२ भा.दं.वि.१८६०, कलम ३६३ अन्वये अज्ञात इसमाविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

(३) मंगळवेढा व सांगोला पोलीस स्टेशन अंतर्गत अवैध धंद्याबाबतच्या केसेसमध्ये जानेवारी ते नोव्हेंबर, २०२१ च्या तुलनेत सन २०२२ मध्ये काही प्रमाणात वाढ झालेली आहे. तथापि, सदरच्या पोलीस घटकाकडून गोपनिय माहितीच्या आधारे व प्राप्त तक्रारीवरुन गुन्हेगारी व अवैध धंद्यावर वेळोवेळी कारवाई करण्यात येत आहे.

तसेच बालकांच्या अपहरणा संबंधिच्या प्रकरणात सन २०२१ मध्ये एकुण १९ गुन्हे दाखल होते, तपासाअंती सर्व बालकांचा शोध लागला आहे. सन २०२२ मध्ये यासंबंधी २४ गुन्हे दाखल आहेत, त्यापैकी २१ मुले मिळून आली असून उर्वरित बालकांचा शोध सुरु आहे.

(४) हरवलेल्या मुलाच्या तपासाकरीता एकुण ४ पथके तयार करुन परिसरात शोध घेण्यात आला आहे. व परिसरातील सी.सी.टी.व्ही ची पडताळणी करण्यात आली आहे. तसेच सदर मुलाचा श्वान पथका मार्फत शोध घेण्यात आला आहे.

मुलाचे आई-वडील यांचेसोबत काम करणाऱ्या व्यक्तींचीही चौकशी करण्यात आली असून मुलाच्या मूळ गावी पथक पाठवून मुलाचा शोध घेण्यात आला आहे. तथापि, सदर मुलगा अद्यापि मिळुन आलेला नसून याबाबत अधिकचा तपास सुरु आहे.

---

**महाराष्ट्र राज्य वित्त विभागाद्वारे के.पी.बक्षी यांच्या अध्यक्षतेखाली**
**नेमण्यात आलेल्या राज्य वेतन सुधारणा समितीबाबत**

**(२६) ५५५४८ (२५-०१-२०२३). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य वित्त विभागाद्वारे दिनांक १७ जानेवारी, २०१७ रोजी मा.के.पी. बक्षी यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ समितीने दिनांक ५ डिसेंबर, २०१८ रोजी प्रसिध्द केलेल्या वेतन सुधारणा अहवाल खंड-पहिला यामध्ये नायब तहसिलदार हे पद '' राजपत्रिक पद '' असूनही इतर विभागातील समकक्ष अधिका-यांच्या तुलनेत कमी मूळ वेतन, कमी प्रवास भत्ता व इतर भत्ते प्राप्त करते असे नमूद केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नायब तहसिलदार यांच्या वेतन त्रुटी व इतर विभागांच्या अशाच वेतन त्रुटीबाबत विविध कर्मचारी व अधिकारी संघटना यांनी लेखी सुधारणा प्रस्तावित केल्यानुसार सदरहू समितीने अहवाल खंड दुसरा वित्त विभागाने मंजूरीने प्रसिध्द करणे अपेक्षित असतांना त्यांस मंजूरी मिळाली नसल्याने राज्यातील सर्व नायब तहसिलदार व इतर विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना नाहक आर्थिक व मानसिक त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**३३/११ Kv सबस्टेशन, केज. अंतर्गत फीडरचे VCB Pol, Maintenance/Replacement. च्या प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत**

**(२७) ५६३७२ (२०-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज (जि. बीड) येथे ३३/११ Kv सबस्टेशन अंतर्गत कानडीमाळी, विडा, दहीफळ, फीडरचे VCB Pol, Maintenance/Replacement करण्याबाबतचा प्रस्ताव उपकार्यकरी अभियंता, महावितरण, केज. यांनी कार्यकारी अभियंता, महावितरण, अंबाजोगाई. यांच्याकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर प्रस्तावाला त्वरित मंजुरी देऊन काम सुरु करणे बाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी अधीक्षक अभियंता, महावितरण, बीड. व कार्यकारी अभियंता, अंबाजोगाई. यांच्याकडे केली होती, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०५-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) केज उपविभागांतर्गत येणाऱ्या विडा व कानडीमाळी उपकेंद्रातील स्थानिक लोकप्रतिनिधींनी सुचवलेली व इतर सर्व कामे करण्यात आलेली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाव्होली ते ह.पिंप्री, (ता. केज, जि. बीड) फिडरला लिंकलाईन करण्याबाबत**

**(२८) ५६३७९ (२०-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाव्होली ते ह.पिंप्री, (ता. केज, जि.बीड) यांनी फिडरला ११ KV लिंकलाईन करणे बाबतचे अंदाजपत्रक कार्यकारी अभियंता, महावितरण, अंबाजोगाई. यांनी मंजुरी साठी अधीक्षक अभियंता, महावितरण, बीड यांच्याकडे सादर केले असून सदर अंदाजपत्रकाला त्वरित मंजुरी देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी अधीक्षक अभियंता, महावितरण, बीड यांचेकडे दिनांक ०८ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०४-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२)केज विभागाअंतर्गत असलेल्या ३३/११ केव्ही राजेगाव उपकेंद्रातील ११ केव्ही नाव्होली वाहिनी व ३३/११ केव्ही ह. पिंप्री उपकेंद्रातील ११ केव्ही पिंप्री कृषी वाहिनी यांना जोडणारी ११ केव्ही लिंकलाईन प्रस्तावित करण्यात आली होती. सदरील लिंक लाईन कृषीपंप वीज जोडणी धोरण- २०२० अंतर्गत कृषी आकस्मिकता निधीमध्ये मंजूर करुन सदरचे काम दि.०२.०२.२०२३ रोजी पूर्ण करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पोलिस निरिक्षक, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, जळगांव यांना सेवेतून बडतर्फ करण्याची केलेली मागणी**

**(२९) ५६४४१ (२९-०१-२०२३). श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, श्री.किरणकुमार बकाले, पोलिस निरिक्षक, जळगांव यांना सेवेतून कायम बडतर्फ करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १५ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा. पोलिस अधिक्षक , पोलिस अधिक्षक कार्यालय, जळगांव यांना लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबधित पोलिस निरिक्षकांवर कोणत्या कलमान्वये कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी प्राप्त तक्रारीवरुन तत्कालीन पोलीस निरीक्षक, श्री. किरणकुमार बकाले, स्थानिक गुन्हे शाखा, जळगांव यांना दि. १४.०९.२०२२ अन्वये शासकीय सेवेतून तात्काळ निलंबित केले आहे. याव्यतिरिक्त त्यांचेविरुध्द केलेल्या प्राथमिक चौकशी अहवालावरुन विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक यांनी त्यांचे आदेश दि. १३.१०.२०२२ अन्वये विभागीय चौकशीचे आदेश दिले असून अपर पोलीस अधिक्षक, धुळे यांचेकडून चौकशी सुरु आहे. तसेच याप्रकरणी तत्कालीन पोलीस निरीक्षक, श्री. किरणकुमार बकाले, स्थानिक गुन्हे शाखा, जळगांव यांचेविरुध्द जिल्हापेठ पोलीस स्टेशन भाग-५, गु.र.नं. ५५१/२०२२ भादंवि कलम १५३(अ)(ब),१६६,२९४,३५४(अ), ५००, ५०१, १२०(ब) सह पोलीस अप्रितीची भावना चेतावणी कायदा १९२२ चे कलम ३ सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६७ प्रमाणे दि. १५.०९.२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आर्वी-आष्टी-कारंजा (जि.वर्धा) या तालुक्यातील कार नदी प्रकल्पातंर्गत मुख्य कालव्याची दुरूस्ती करण्याबाबत

**(३०) ५६४४९ (२७-०१-२०२३). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आर्वी-आष्टी-कारंजा (जि.वर्धा) या तालुक्यातील कार नदी प्रकल्पातंर्गत शेतकऱ्याच्या शेतीला पाणी मिळण्याच्या उेद्दशाने ३३ कि.मी. लांबीचे मुख्य कालवे तयार झाले असुन त्या कालव्याव्दारे ५६०० हेक्टर क्षेत्र सिंचन होणे अपेक्षीत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्या कालव्याचे काम निकृष्ठ दर्जाचे झाल्यामुळे तेथील कालव्याद्वारे पाणी फक्त १५ कि.मी. पर्यंत पोहचत असून १५०० हेक्टर सिंचन होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कालव्यांच्या दुरूस्तीसाठी शासनाची मान्यता मिळाली असून सुध्दा अजून पर्यत त्या कालव्याचे दुरूस्तीचे कामास सुरूवात झाली नसल्यामुळे कारंजा व आष्टी तालुक्यातील १७ गावे सिंचना पासून वंचीत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या कामाचे अदांजपत्रकाच्या प्रस्तावास शासनामार्फत मान्यता मिळण्याकरिता कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे, सद्यस्थितीत कालव्याचे कि. मी. १७ पर्यंत पाणी पाहोचले असुन सदर क्षेत्र हे Fissured rock व अती भरावाचे असल्याने कालव्यातील पाझरामुळे पुर्ण लांबीत पाणी पाहोचत नाही. सन २०२०-२१ मध्ये १९०० हे. सिंचन झालेले आहे.
(३) अंशत: खरे आहे, वर्धा जिल्ह्यातील कारंजा व आष्टी तालुक्यातील एकूण २३ गावांपैकी सद्यस्थितीत ०९ गावांना सिंचनाचा लाभ देण्यात येत आहे. कालव्याचे कि.मी. १० ते २० मधील अस्तरीकरणाची कामे प्रगतीपथावर आहेत. सदर कामे पुर्ण झाल्यास सुसुंद्रा लघु कालवा व वाडेगाव वितरीकेपर्यंत पाणी पोहोचविणे शक्य होईल. तसेच कि. मी. ० ते १० व कि.मी २१ ते ३३ मधील अस्तरीकरणाच्या कामाचे अंदाजपत्रक तयार करण्याचे काम क्षेत्रीय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

(४) कि. मी. ० ते ३३ मध्ये अस्तरीकरणाची कामे चतुर्थ सुप्रमामध्ये मंजुर आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील विविध केंद्र व राज्य योजनांच्या मुल्यमापनासाठी राज्यातील बाहयस्थ संस्थांची तालिका सुची तयार करण्याबाबत

**(३१) ५६४७९ (२७-०१-२०२३). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विविध केंद्र व राज्य योजनांच्या मुल्यमापनासाठी राज्यातील बाहयस्थ संस्थांची तालिका सुची तयार करण्याची मागणी लोकप्रतिनिधींना मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दि.१८ आक्टोंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विविध विकासात्मक योजनांच्या उदिदष्टांची पुर्तता व योजना राबविताना येणाऱ्या अडचणी जाणुन घेण्यासाठी नियोजन विभागाच्या अधिपत्याखाली अर्थ व सांख्यिकी संचालयामार्फत त्रेयस्थ संस्थाकडुन योजनांचे मुल्यमापन करण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बाहयस्थ संस्थांची तयार करण्यात आलेली नामिकासुचीची मूदत शासन निर्णयानुसार दिनांक २२ जुलै, २०२२ रोजी संपली असून तात्काळ नव्याने तालिका सुची तयार करणेबाबत व त्यामध्ये राज्यातील संस्थांची निवड करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०२-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.
(२) होय हे खरे आहे.
(३) अर्थ व सांख्यिकी संचालनालयामार्फत त्रयस्थ संस्थाकडून योजनांचे मूल्यमापन करण्यासाठी बाह्यस्थ संस्थांची नामिकासूची तयार करण्यासाठी विनंती प्रस्ताव मसूदा (RFP) अंतिम करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. विनंती प्रस्ताव मसूदा (RFP) अंतिम झाल्यानंतर निविदा प्रक्रीया राबविण्यात येईल व बाह्यस्थ संस्थांची नव्याने नामिकासूची तयार करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नगर परिषद खामगांव (जि.बुलढाणा) येथे रेल्वे गेट ते क्रिडांगण पर्यंत १५ मीटर रुंद रस्त्याच्या कामामध्ये झालेला गैरव्यवहार

**(३२) ५६६३५ (३०-०४-२०२३). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नगर परिषद खामगांव (जि.बुलढाणा) येथे रेल्वे गेट ते क्रिडांगण पर्यंत १५ मीटर रुंद रस्त्याच्या कामामध्ये माजी नगराध्यक्ष व तत्कालीन मुख्याधिकारी यांनी कंत्राटदाराचे हित जोपासण्यासाठी नगर परिषदेच्या सार्वजनिक रक्कमेचा ५ लाख रुपयांचा अपहार करुन नगर परिषदेचे आर्थिक नुकसान केल्याबाबत दिनांक २५ फेब्रुवारी, २०११ रोजी एम.केस न.०१/२०११ नुसार कलम १५६ (३) अन्वये खामगांव शहर पोलीस स्टेशनला कारवाई करण्याचे आदेश दिले होते हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तत्कालीन पोलीस अधिक्षक बुलढाणा यांचे आदेशाने सदर गुन्हयाचा तपास स्थानिक गुन्हे शाखा बुलढाणा यांच्याकडे दिनांक १३ डिसेंबर, २०१३ रोजी वा त्यासुमारास देण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर गुन्हयात तत्कालीन मुख्याधिकारी व इतर यांच्या विरुध्द तपास करीत असतांना पुरावे मिळून आले असतांना सुध्दा स्थानिक गुन्हे शाखा बुलढाणा यांनी दिनांक १३ डिसेंबर, २०१३ ते आजपावेतो कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबधित आरोपीना तसेच त्यांना पाठीशी धरण्याऱ्या संबधित पोलीस खात्यातील अधिकारी कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०२३) :**(१) व (२) होय.
(३) सदर गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे शाखा, बुलढ़ाणा यांना हस्तांतरीत केल्यानंतर गुन्हाचा तपास पूर्ण करून गुन्ह्यातील आरोपींविरुद्ध मा. न्यायदंडाधिकारी, प्रथमश्रेणी न्यायालय -०१, खामगाव येथे सी.सी.क्र. ४७९/२०२२, दिनांक ०२.०७.२०२२ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खामगांव (जि.बुलढाणा) येथे नवीन न्यायालयीन इमारत बांधकाम करण्याबाबत

**(३३) ५६६३६ (३०-०४-२०२३). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगांव (जि.बुलढाणा) येथे नवीन न्यायालयीन इमारत बांधकाम करण्याबाबतचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभाग खामगांव यांनी त्रुटी पुर्तता करुन शासनाकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खामगांव येथे अस्तित्वात असलेली मा.न्यायाधीश कक्षांची जागा शिकस्त व फार जुनी झाले आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, न्यायाधीश कक्षांची निकड लक्षात घेता नवीन न्यायालयीन इमारत बांधकाम करण्याबाबत मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०५-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दिनांक १० फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या पत्रान्वये खामगांव, जिल्हा बुलढाणा येथे नवीन न्यायालयीन इमारत बांधण्याबाबचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला आहे.
(२)होय, हे खरे आहे.
(३) सदर प्रस्तावास सार्वजनिक बांधकाम विभाग, नियोजन विभाग व वित्त विभागाने प्रशासकीय मान्यता देण्यास सहमती दर्शविलेली असून सदर प्रस्ताव मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय सचिव समितीसमोर सादर करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठविण्यात आलेला आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

## खानदेशाच्या सर्वांगीण विकासासाठी स्वतंत्र वैधानिक मंडळ स्थापन करण्याबाबत

**(३४) ५६८४० (३०-०४-२०२३). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण):** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या विकासाच्या दृष्टीने खानदेशाचा भाग अतिशय मागासलेला असून खानदेशाच्या विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी खानदेश वैधानिक विकास मंडळाची स्थापना करण्यात यावी, अशी मागणी खानदेश विकास फोरमने व स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली असल्याचे दिनांक १८ जानेवारी २०२३ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणी च्या अनुषंगाने खानदेशच्या सर्वांगीण विकासासाठी स्वतंत्र वैधानिक मंडळ स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती ठोस कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०६-२०२३) :** (१) खानदेश वैधानिक विकास फोरमच्या दि.६.६.२०२० व दि.३.१.२०२३ रोजीच्या निवेदनाद्वारे खानदेश वैधानिक विकास मंडळाची स्थापना करण्याची मागणी करण्यात आली आहे.(२) खानदेशच्या सर्वांगीण विकासासाठी उत्तर महाराष्ट्र वैधानिक मंडळ स्थापन करण्याबाबत राज्य विधामंडळाच्या दोन्ही सभागृहांनी दि. १३ जुलै, २००६ रोजी मंजूर केलेला ठराव दि. २६ फेब्रुवारी, २००७ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनास पाठविण्यात आला असून त्यानुसार उत्तर महाराष्ट्र वैधानिक मंडळ स्थापन करण्याबाबत भारतीय संविधानाच्या अनुच्छदे ३७१(२) (अ) मध्ये दुरूस्ती करण्याची मा. गृहमंत्री, भारत सरकार यांना विनंती करण्यात आली आहे. तद्नंतर,मा. मुख्यमंत्री महोदयांच्या दि. २ जुलै, २०१४, दि. २७ सप्टेंबर, २०१८ व दि. ७ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या पत्रान्वये केंद्रशासनाकडे पाठपुरावा करण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चांदवड ( जि.नाशिक ) येथील महिला पोलिस कर्मचा-यांनी आशा कर्मचारी यांना केलेल्या मारहाणीबाबत**

**(३५) ५७१९४ (३०-०४-२०२३). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदवड ( जि.नाशिक ) येथील महिला पोलिस कर्मचा-यांनी आशा कर्मचारी यांना केलेल्या मारहाणीची चौकशी करण्यासाठी आयटक आशा गट प्रवर्तकांनी माहे जानेवारी,२०२३ मध्ये वात्यादरम्यान मुकमोर्चा काढला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोबाईल चोरीचा तपासासाठी पोलिसांनी आशा कर्मचारी रेणुका तलवारे यांना मारहाणीच्या निषेधार्थ आशा कर्मचारी व गट प्रवर्तकानी पंचायत समितीसमोर धरणे आंदोलन करुन गटविकास अधिका-यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढहून आले,

(४) तदनुसार, मारहाण करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०२३) :** (१) व (२) चांदवड जि. नाशिक येथील महिला पोलिस अंमलदार यांनी आशा वर्कर यांना केलेल्या मारहाणीची चौकशी करण्यासाठी आशावर्कर यांनी एकत्रीत जमून गटविकास अधिकारी पंचायत समिती, चांदवड यांना निवेदन दिलेले आहे.
(३) सदर प्रकरणी उपविभागीय पोलीस अधिकारी मनमाड विभाग, मनमाड यांनी चौकशी करुन आशावर्कर श्रीमती रेणुका तलवारे यांचा जबाब नोंदविला असुन सदर जबाबात त्यांनी काही एक तक्रार नसल्याचे सांगीतले आहे.
(४) महिला पोलीस अंमलदार यांच्या विरुध्द आशा वर्कर श्रीमती रेणुका तलवारे यांची तक्रार नसल्याने सदर प्रकरणी कारवाई करण्यात आलेली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही

---

**नागपूर येथील महाराष्ट्र सुदूर संवेदन उपायोजन केंद्रातील कंत्राटी पध्दतीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर होत असलेल्या अन्यायाबाबत**

**(३६) ५७२६७ (०२-०५-२०२३). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र (MRSAC)यामधील संचालक तसेच शासकीय कर्मचारी हे तेथील कंत्राटी पध्दतीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर अन्याय, अत्याचार व शोषण करीत असल्याच्या तक्रारी तेथील कंत्राटी कर्मचाऱ्यांनी माहे जुलै, २०२१ मध्ये वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, मुख्य सचिव यांचेकडे लेखी निवेदना स्वरुपात दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवेदनातील मागण्यांचे थोडक्यात स्वरूप काय आहे,
(३) असल्यास, उपरोक्त मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०५-२०२३) :**(१) हे अंशत: खरे आहे.
अशा स्वरुपाची तक्रारदाराचे नाव, स्वाक्षरी व दिनांक नसलेली निनावी निवेदने माहे सप्टेंबर, २०२२ व माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये नियोजन विभागास प्राप्त झाली आहेत.
(२), (३) व (४)
सदर निवेदनामध्ये महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र (MRSAC) नागपूर येथील संचालक (Director) व तेथील नियमित कर्मचारी यांच्याबाबत तक्रार करण्यात आली आहे. तथापि,
सदर निवेदनामध्ये तक्रारदाराचे नाव, पत्ता, दिनांक व सही नसल्याने, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक दि. २५.२.२०१५ अन्वये उपरोक्त दोन्ही निवेदनांवर कार्यवाही करण्यात आली नाही.
तथापि, सदरील निवेदनातील तक्रारीच्या अनुषंगाने अहवाल मागविण्यात आला असता, तक्रारीत तथ्य नसल्याचे आढळून आले आहे.

---

**पुणे प्रादेशिक परिवहन विभागात रिक्षा मीटर पुन:प्रमाणीकरण प्रमाणपत्र वितरणात झालेला गैरव्यवहार**

**(३७) ५७६०५ (२६-०४-२०२३). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे प्रादेशिक परिवहन विभागाचा बनावट शिक्का आणि अधिकाऱ्यांची सही या माध्यमातून रिक्षा मीटर पुन:प्रमाणीकरण प्रमाणपत्र वितरीत केल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचा गैरव्यवहार हा पुणे प्रादेशिक परिवहन विभागाच्या आळंदीरोड, फुले नगर येथे निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, पुणे प्रादेशिक परिवहन विभागाने बंड गार्डन पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असल्याचे ही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुसार बनावट शिक्का आणि अधिकाऱ्यांची सही या माध्यमातून रिक्षा मीटर पुन:प्रमाणीकरण प्रमाणपत्र वितरीत करणाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०५-२०२३) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे कार्यालयातील सहा. मोटार वाहन निरिक्षक पदावर कार्यरत श्रीमती तनुजा डोके यांचा बनावट शिक्का व त्यांची बनावट सही याचा वापर करुन एकूण ६ ऑटोरिक्षांचे मीटर पूनः प्रमाणीकरण प्रमाणपत्रे वितरीत केल्याबाबत येरवडा पोलीस स्टेशन येथे प्रथम खबरी अहवाल क्र. ०५६९/२०२२ नुसार दि.०६.१२.२०२२ रोजी गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे.
सदर गुन्हयातील आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्या विरोधात मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, शिवाजीनगर, कोर्ट नंबर ५, पुणे येथे दिनांक ०१.०२.२०२३ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
(५) लागू नाही.

---

**आदिवासी विद्यार्थ्यांना उच्च दर्जाच्या शिक्षणासाठी देण्यात येत असलेल्या परदेशी शिष्यवृत्ती योजनेबाबत**

**(३८) ५७८५६ (३०-०४-२०२३). श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.अनिल पाटील (अमळनेर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण मिळावे या उद्देशाने आदिवासी विकास विभागाकडून परदेशी शिष्यवृत्ती योजना सुरू करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेचा प्रचार व प्रसार न झाल्याने आणि योजनेतील जाचक अटींमुळे एकही आदिवासी विद्यार्थी या योजनेचा लाभार्थी नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिष्यवृत्ती योजनेचा लाभ कसा घ्यावा, त्यांच्या अभ्यासक्रमांची माहिती कुठून घ्यावी, परदेशी भाषांचे शिक्षण कुठून घ्यावे याची माहितीच विद्यार्थ्यांना नाही, त्यामुळे आदिवासी विभागाने प्रशिक्षण अभ्यासक्रम सुरू करावा अशी मागणी अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. विजयकुमार गावीत (११-०५-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सन २००७-०८ ते सन २०२२-२३ या कालावधीत एकूण ४५ विद्यार्थ्यांना परदेश शिष्यवृत्तीचा लाभ मंजूर करण्यात आला आहे.

(३) अशाप्रकारचे कोणतेही निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(४) शासन निर्णय दिनांक १६.०३.२०१६ अन्वये अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याच्या अनुषंगाने अर्ज सादर करण्यापासून ते लाभार्थ्यांची निवड करण्याबाबतचा कालबध्द कार्यक्रम नमूद केला आहे. त्या अनुषंगाने आयुक्त कार्यालयस्तरावरुन प्रतिवर्षी माहे मे मध्ये परदेशी शिष्यवृत्ती योजनेची जाहिरात स्थानिक वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द करण्यात येते.

तसेच शासन निर्णय दिनांक १६.०३.२०१६ अन्वये विद्यार्थ्यांच्या पालकांची उत्पन्न मर्यादा रुपये ६.०० लक्ष इतकी करण्यात आली आहे. तसेच विद्यापीठांचे क्यू एस वर्ल्ड रॅकींग ३०० ठेवण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये चालक वाहन परवाना वितरणाचे काम विस्कळीत झाल्याबाबत**

**(३९) ५८०३३ (२६-०४-२०२३). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये चालक परवाना मिळवण्यासाठी ज्या नागरिकांनी परीक्षा दिलेली होती त्यांना वाहन परवाना न मिळल्याने तीस हजार वाहन चालक परवान्याच्या प्रतीक्षेत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून स्मार्ट कार्डचा पुरवठा करणाऱ्या कंपनीने काम थांबविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रिक्षा चालकांना कायमस्वरूपी परवान्यासाठी मुलाखत द्यावी लागते यासाठी सुद्धा दीड ते दोन महिने वाट पाहावी लागते हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०५-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

तथापि, अनुज्ञप्ती छपाई करण्याकरीता नेमण्यात आलेल्या सेवापुरवठादार यांच्याकडून कोऱ्या स्मार्ट कार्ड चा पुरवठा कमी प्रमाणात झाल्याने पुणे कार्यालयामध्ये १७२२२ अनुज्ञप्तीचे कामकाज प्रलंबित आहे. अतिरिक्त मनुष्यबळ वापरुन सदरचे काम पुर्ण करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) नाही.

(३) रिक्षाचालकांना कायमस्वरुपी परवान्यासाठी कोणतीही मुलाखत द्यावी लागत नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बक्षी समितीच्या अहवालातील शासकीय वाहन चालकांच्या वेतन त्रुटीबाबत

**(४०) ५८०७४ (३०-०४-२०२३). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या वेतनातील त्रुटी दूर करण्यासाठी दिनांक १७ जानेवारी, २०१७ रोजी सातव्या वेतन आयोगासंदर्भात शासनाने नेमलेल्या बक्षी समितीचा अहवाल माहे जानेवारी, २०२३ मध्ये झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत शासनाने स्वीकारला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बक्षी समितीने सादर केलेल्या सदर अहवालात शासकीय वाहन चालकांबाबतच्या वेतन त्रुटीबाबत मागणीचा समावेश असतांना मात्र वेतन संरचने संदर्भात उल्लेखच नसल्याचे निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यासंदर्भात वाहन चालक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी मा.मुख्यमंत्री मा.उपमुख्यमंत्री तसेच अप्पर मुख्य सचिव (वित्त) मंत्रालय यांची भेट घेऊन त्यांना निवेदने सादर केली असल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने त्याबाबत चौकशी केली आहे काय व त्यानुसार वेतन त्रुटी समितीसमोर वाहन चालकांनी त्याचवेळी (२०१७) सादर केलेल्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व केव्हा,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) वाहनचालक संवर्गाच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्याबाबत वाहन चालक संवर्गाकडून राज्य वेतन सुधारणा समितीसमोर मागणी नोंदविण्यात आलेली होती. तथापि, राज्य वेतन सुधारणा समितीने वाहन चालक संवर्गाबाबत वेतन संरचनेबाबत शिफारस केलेली नसल्याने दि.१३ फेब्रुवारी, २०२३ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयात वाहन चालक या संवर्गाचा समावेश करण्यात आलेला नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोकणाच्या विकासासाठी कोकण क्षेत्र विकास व नियोजन प्राधिकरणाची स्थापना करण्याबाबत

**(४१) ५८१४७ (३०-०४-२०२३). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणाच्या विकासासाठी कोकण क्षेत्र विकास व नियोजन प्राधिकरणाची स्थापना करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच कोकणात काजू बोर्डाची स्थापना धूपप्रतिबंधक बंधारे सीआरझेड मधून मुक्त व मुंबई गोवा महामार्गाचे काम व बारसू येथील रिफायनरीबाबतही लवकरच निर्णय घेण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्राधिकरणाची स्थापना केव्हा करण्यात येणार आहे, तसेच प्राधिकरणाची कक्षा व सदस्य कोण असणार आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०६-२०२३) :** (१) कोकणाच्या विकासासाठी कोकण क्षेत्र विकास व नियोजन प्राधिकरणाची स्थापना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(२) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या दिनांक १६ मे, २०२३ च्या शासन निर्णयान्वये "राज्यातील काजू फळ पिकाच्या विकासाकरीता महाराष्ट्र राज्य काजू मंडळ स्थापन" करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
धुपप्रतिबंधक बंधारे बाबतचे प्रस्ताव महाराष्ट्र सागरी किनारा व्यवस्थापन प्राधिकरणाच्या बैठकीत विचारार्थ ठेवण्यात येतात व प्रकरणपरत्वे त्यास शिफारस करण्यात येते. समुद्र धुपप्रतिबंधक बंधारे सीआरझेड मधून मुक्त करणे ही केंद्र शासनाची धोरणात्मक बाब आहे.
मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ च्या पनवेल ते इंदापूर या महामार्गाचे पनवेल ते कासू (०.०० ते ८४.६ कि.मी.) व कासू ते इंदापूरचे काम कंत्राटदाराने सुरू केले असून दोन्ही बाजूकडील २२.०० कि.मी.चे काम पूर्ण करण्यात आले आहे व उर्वरित काम प्रगतीपथावर आहे. तसेच, राष्ट्रीय महामार्ग महामंडळामार्फत प्रगतीपथावर असलेल्या एकूण ३६६.१७ कि.मी. लांबीपैकी २५४.३२४ कि.मी. लांबीचे काम पूर्ण झाले असून उर्वरित काम प्रगतीपथावर आहे.
बारसू तसेच नाटे परिसरातील हरित रिफायनरी प्रकल्पाकरिताचे प्राथमिक सुसाध्यता सर्वेक्षणाचे काम रत्नागिरी रिफायनरी पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड मार्फत करण्यात आले असून त्यांच्या स्तरावर प्रकल्पाचे तांत्रिक व वित्तीय मुल्यमापन सुरू आहे. तद्नंतर सुयोग्य कार्यवाही करण्यात येईल.
(३) कोकण क्षेत्र विकास व नियोजन प्राधिकरण स्थापना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

---

## चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर येथे शासकीय न्यायालयीन इमारत व न्यायाधिशाच्या निवासाकरीता निवास स्थान बांधण्याबाबत

**(४२) ५८५७९ (०८-०५-२०२३). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर येथे शासकीय न्यायालयीन इमारत व न्यायाधिशाच्या निवासाकरीता निवास स्थान नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, १५ वर्षाच्या कालावधीत होऊनही अद्यापर्यंत इमारत पुर्ण न होण्यामागची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर इमारतीकरीता शासन जागा उपलब्ध करून न्यायालयीन इमारत व न्यायाधिशासाठी निवासस्थान बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.

सद्य:स्थितीत नगर परिषद, बल्लारपूर यांच्या मालकीच्या इमारतीमध्ये न्यायालयीन कामकाज सुरु असून, सदर इमारत सन २००८ पासून भाडे तत्वावर घेण्यात आलेली आहे.

तसेच बल्लारपूर येथे सध्या दोन न्यायाधिश कार्यरत असून ते सध्या भाडे तत्वावरील निवासस्थानात रहात आहेत.

(२) राज्यातील न्यायालयांचे सनियंत्रण मा.उच्च न्यायालयाकडे आहे. त्यानुसार न्यायालयीन इमारतींच्या बांधकामाचे प्रस्ताव मा.उच्च न्यायालयाच्या बांधकाम समितीने मंजूरी दिल्यानंतर शासनास प्राप्त होत असतात. तद्नंतर शासनामार्फत पुढील कार्यवाही करण्यात येते.

बल्लापूर, जिल्हा चंद्रपूर येथे न्यायालयीन इमारत व न्यायाधीश निवासस्थान बांधण्याकरिता नगर परिषद, बल्लारपूर येथील सर्व्हे क्र.१०७४ व सर्व्हे क्र.२११ पैकी ०.३६ हे.आर. जमीन जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी उपलब्ध करुन दिली होती. परंतु मा.उच्च न्यायालयाच्या बांधकाम समितीने मंजूर केलेल्या टाईप प्लॅननुसार न्यायालयीन इमारत व न्यायाधीश निवासस्थाने बांधण्याकरीता सदर जागा अपूरी होती. सबब, मा.उच्च न्यायालयाने पर्यायी जागा संपादन करण्यासाठीचे निर्देश प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश, चंद्रपूर यांना दिले आहेत. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) या अनुषंगाने, मा.प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश, चंद्रपूर यांनी बल्लारपूर येथे न्यायालयीन इमारत व न्यायाधीश निवासस्थानाकरीता ५.०० एकर जागा उपलब्ध करुन देण्याबाबत मा.जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना विनंती केली आहे. त्यानुसार न्यायालयीन इमारत व न्यायाधीश निवासस्थानाकरीता जागा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्याकडून सुरु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

## शहापूर ( जि.ठाणे) तालुक्यातील आदिवासी गावपाडयाल रस्त्यांच्या अंदाजपत्रकाची नस्ती ठाणे जिल्हा परिषदेकडे प्रलंबित असल्याबाबत

**(४३) ५९०७६ (२६-०४-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर तालुक्यातील (जि.ठाणे) ५७ आदिवासी गावपाडे मजबूत रस्त्याने मुख्य रस्त्यांना जोडण्याकरिता सुमारे २० कोटीचे अंदाजपत्रकाची नस्ती ठाणे जिल्हा परिषदेकडे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटनांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, शहापूर यांना दिनांक ५ जानेवारी, २०२३ रोजी निवेदन देऊन

दिनांक २३ जानेवारी, २०२३ रोजी पंचायत समिती, शहापूर कार्यालयावर मोर्चा काढून आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने आदिवासी वस्त्या व पाडे मुख्य रस्त्यांना त्वरेने जोडण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (१२-०५-२०२३) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) राज्यातील आदिवासी वाडे/पाडे, आश्रमशाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र बारामाही रस्त्याने जोडण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हातनोशी (ता.भोर जि.पुणे) येथे सांस्कृतिक भवनासाठी जिल्हा वार्षिक नियोजन समिती आराखडा मधुन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४४) ५९१७६ (३०-०४-२०२३). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हातनोशी (ता.भोर जि.पुणे) येथे सांस्कृतिक भवनासाठी जिल्हा वार्षिक नियोजन समिती आराखडा सन २०२२-२३

मधून नाविण्यपूर्ण योजनेतून निधी उपलब्ध करुन देणेबाबत उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तथा पालक मंत्री पुणे जिल्हा यांना दिनांक २० डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने सांस्कृतिक भवनासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे
(२) व (३) नियोजन विभागाच्या दिनांक २७/०८/२०१४ च्या शासन निर्णयानुसार सदर काम अनुज्ञेय नसल्याबाबत मा.आमदार महोदयांना जिल्हा नियोजन अधिकारी, पुणे यांचेस्तरावरुन दिनांक ०६/०१/२०२३ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

---

## शिर्डी साईसंस्थानात कामगारांची वेतन कपात केल्याबाबत

**(४५) ५९२६७ (२७-०४-२०२३). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिर्डी साईसंस्थानात सोळा-सतरा वर्षे कंत्राटी पदावर काम केल्यानंतर यातील ५९८ कामगारांना दोन-अडीच वर्षापूर्वी संस्थान आस्थापनेवर घेण्यात आली असून कामगारांचा पूर्वीपेक्षा चाळीस टक्के पगार कमी मिळत असल्याची बाब दिनांक २८ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायद्यानुसार देण्यात येणाऱ्या वेतनात ४०% वेतनवाढ देण्याचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कामगारांचे पगार वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०५-२०२३) :** (१) शासनाच्या दिनांक १७/०९/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये सन २००१ ते २००४ या कालावधीत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व निर्णयाच्या दिनांकास कार्यरत असलेल्या एकूण ६३५ कुशल व अकुशल कर्मचा-यांना अनुक्रमे दरमहा रुपये ५९१३ व ५११३ इतके एकत्रित मासिक वेतन किंवा किमान वेतन कायदयानुसार अनुज्ञेय होणारे वेतन यापैकी जे जास्त असेल ते वेतन देण्यास व शासनाच्या दिनांक ७/०८/२००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर केलेल्या आकृतीबंधातील कंत्राटी पदावर नियुक्ती देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.व्यवस्थापन समितीच्या दिनांक २५/०२/२०१७ रोजीच्या सभेत संस्थानाकडे ठेकेदारामार्फत कार्यरत कंत्राटी कर्मचारी यांना सहानुभूतीच्या दृष्टीकोनातून एक विशेष बाब म्हणून दिनांक १ एप्रिल २०१७ पासून किमान वेतनावर ४०% वेतनवाढ देण्यात आली आहे. दिनांक १७/०९/२०१९ शासन निर्णयानुसार संस्थानाच्या आकृतीबंधावरील मंजूर कंत्राटी कामगारांना किमान वेतन कायदयानुसार वेतन अदा केले जाते.
(२) होय, हे खरे आहे.
(३) , (४) व (५)
शासनाच्या दिनांक १७ सप्टेंबर २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या आस्थापनेवरील कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने कार्यरत असणा-या ६३५ कर्मचा-यांना संस्थानच्या मंजूर आकृतीबंधातील कंत्राटी पदावर सामावून घेण्यात आले आहे. या कर्मचा-यांना किमान वेतन कायदयानुसार देण्यात येणा-या वेतनात ४०% वेतनवाढ देण्याचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून तो शासनाच्या विचाराधिन आहे.

---

## वणी (जि.यवतमाळ) तालुक्यातील वणी व शिरपुर पोलिस ठाण्याच्या हद्दीत अनेक अवैध धंदे सुरु असल्याबाबत

**(४६) ६००४७ (२७-०४-२०२३). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वणी (जि.यवतमाळ) तालुक्यातील वणी, शिरपुर पोलीस ठाण्याच्या हददीत मोठया प्रमाणात मटका, जुगार अड्डे व अवैध वाहतूक, गाडी लंपास इ. प्रकार होत असल्याची बाब माहे जानेवारी २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या भागातील सुरु असलेल्या अनेक अवैध धंदयांना आळा बसण्यासाठी व या प्रकरणाकडे दुर्लक्ष करणा-या संबंधीत अधिकारी व कर्मचा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०२३) :** (१) व (२) यवतमाळ जिल्ह्यातील वणी व शिरपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये माहे जानेवारी, २०२३ मध्ये अवैध वरली, मटका व जुगार, अवैध दारू, वाहन चोरी, अवैध वाहतूक इ. गुन्ह्यांच्या अनुषंगाने केलेल्या कारवाईचा तपशील : -

| प्रकार | एकूण गुन्हे | आरोपी | जप्त मुद्देमाल |
|---|---|---|---|
| अवैध वरली, मटका व जुगार | ३० | ३१ | २,६९,९१०/- |
| अवैध दारू | १८ | १५ | १५,७१,४४०/- |
| वाहन चोरी | ०३ | -- | -- |
| अवैध वाहतूक | ३० | -- | -- |

(३) पोलीस स्टेशन हद्दीमध्ये कोठेही अवैध धंदे चालणार नाही याबाबत प्रभारी अधिकारी यांना पोलीस अधिक्षक, यवतमाळ यांच्या स्तरावरून आदेशीत करण्यात आले आहे. गोपनीय माहिती व तक्रारीच्या आधारे अवैध धंद्यांवर वेळीच छापे टाकून कायदेशीर कारवाई करण्यात येते. अवैध धंद्यांकडे दुर्लक्ष केल्याची बाब निदर्शनास आल्यास संबंधीत अधिकारी/अंमलदार यांचेविरुद्ध कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांच्या रिक्त जागा भरण्याबाबत

**(४७) ६०३०५ (२६-०४-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य प्रादेशिक परिवहन कार्यालयातील रिक्त पदे भरली जात नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिवहन खात्याने मंजुर केलेल्या नवीन आकृतीबंधानुसार प्रादेशिक परिवहन अधिका-यांची पदे १६ वरुन २८ करण्याचा निर्णय घेण्यात आला असून सुध्दा ९ नवीन प्रादेशिक परिवहन कार्यालयांना मंजुरी देवून देखील पदोन्नतीस देण्यास विलंब लावत असल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात जुन्या १६ प्रादेशिक परिवहन अधिका-यांच्या पदापैकी १० पदे रिक्त असून केवळ ६ अधिकारी कार्यरत असल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रिक्त पदांमुळे कार्यालयातील धोरणात्मक निर्णयांसह तेथील विविध कामांवर त्याचा परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार प्रादेशिक परिवहन कार्यालयातील रिक्त पदे भरती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०५-२०२३) :**(१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

(४) नाही.

प्रादेशिक परिवहन कार्यालयातील रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकाऱ्यांना देण्यात आला असून संबंधित कार्यालयीन कामकाजाचा निपटारा करण्यात येत आहे.

(५) प्रादेशिक परिवहन कार्यालयातील रिक्त पदे भरण्याची बाब कार्यवाही खाली आहे.

---

## उल्हासनगर (जि.ठाणे) येथील नागरिकांसाठी आर टी ओ कॅम्प सुरु करण्याबाबत

**(४८) ६०३९२ (२६-०४-२०२३). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) शहरातील नागरिकांसाठी सन २००९ ते सन २०१४ याकालावधीत (RTO) कॅम्प सुरु होता पण सदर कॅम्प पुन्हा सुरु करण्याची मागणी नागरिकांकडून लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कॅम्प बंद झाल्याने नागरिकांना कल्याण येथे जाण्यास अडचणीचे आणि खर्चिक होत असल्यामुळे नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, तसेच अंबरनाथ आणि बदलापूर येथे कॅम्प सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी सदर कॅम्प नागरिकांसाठी पुन्हा सुरु करण्यासाठी राज्यशासनाने तथा संबंधित विभाग यांच्या वतीने कोणती उपाय योजना व कार्यवाही करण्यात आलेली आहे

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०५-२०२३) :** (१) होय.

मा.आ.श्री.कुमार आयलानी, वि.स.स. यांनी दि.१७.०८.२०२२ रोजी "उल्हासनगर येथे आर. टी.ओ. कॅम्प सुरु करण्याबाबत" चे निवेदन मा. मुख्यमंत्री महोदय यांना दिले आहे.

(२) नाही.

(३) होय.

अंबरनाथ व बदलापूर हे अंतर उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, कल्याण पासून १२ ते १५ कि.मी. अंतरावर असल्याने सदर ठिकाणी कॅम्प चे आयोजन केले जाते.

(४) व (५)

उल्हासनगर शहर हे उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, कल्याण पासून अवघ्या ४ कि.मी. अंतरावर असून, नागरिकांना येण्या - जाण्यासाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे.

लायसन्स, चालक परवाना, परवाना नूतनीकरण या सर्व सेवा ऑनलाईन झाल्या आहेत. सदर सेवा या FACELESS स्वरुपात असल्याने, नागरिकांना कार्यालयात येण्याची आवश्यकता नाही. या सर्व बाबीं विचारात घेता उल्हासनगर येथे कॅम्प चालु करणेची आवश्यकता दिसून येत नाही.

---

## राज्यात वन जमिनीवर शेती करणाऱ्या आदिवासी बांधवांचे वनहक्क दावे मंजूर करण्यास विलंब होत असल्याबाबत

**(४९) ६०४१२ (१९-०४-२०२३). श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आदिवासी बहुल क्षेत्रात आदिवासी बांधव वन जमिनीवर ३० वर्षापूर्वीपासून अतिक्रमण असलेल्या जागेवर शेती करीत असून शासनाने अद्यापपर्यंत वनहक्क जमीनीचे पट्टे वितरीत केले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी वन विभागाच्या यंत्रणेने ग्लोबल पोझिशनिंग सिस्टम मशीनच्या सहाय्याने वन हक्क दावे प्रस्तावित करण्यासाठी सन २००९ या कालावधीत मोजमाप केले असून दस्तावेज सुरक्षित न ठेवता गहाळ झाल्यामुळे आदिवासी बांधवांचे वन हक्क दावे दाखल होवू शकले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वन विभागाचे अधिकारी दंडूकेशाहीचा वापर वारंवार करीत असल्याने व आदिवासी बांधवांवर गुन्हे दाखल करीत असल्याने भंडारा जिल्ह्यातील अतिक्रमण धारक शेतकऱ्यांनी सामूहीक आत्मदहन करण्याकरीता मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत वन हक्क जमिनीचे पट्टे आदिवासी बांधवांना मिळण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (३१-०५-२०२३) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) वनहक्क समिती मौजा गोंडीटोला (सुकळी) न. ता.तुमसर, जि.भंडारा यांनी, गोंडीटोला गावाशेजारील झुडपी जंगल जागेत शेती करीत असलेल्या अतिक्रमणधारक १४ आदिवासी बांधवावर वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी अन्याय करीत असल्याबाबतचे दि.१७/०१/२०२३ रोजीचे निवेदन उपवनसंरक्षक, वन विभाग कार्यालय, भंडारा यांना दिले आहे व निवेदनाची प्रत मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना चिन्हांकित केलेली आहे.

(४) अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ अन्वये आदिवासी बांधवांना वैयक्तिक व सामूहिक वनहक्क किंवा दोहोंचे धारणाधिकार मान्य/अमान्य करण्यासाठी उपविभागस्तरीय समित्या व जिल्हास्तरीय समित्या स्थापन करण्यात आले आहेत. वन हक्क दावा मान्य/ अमान्य करण्याचा अंतिम अधिकार हा जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीस आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगाव जिल्हा पोलीस दलाने जिल्ह्यातील विविध उपविभागीय अधिकाऱ्यांकडे पाठविलेल्या हद्दपारीच्या प्रस्तावाबाबत

**(५०) ६०६७१ (०३-०५-२०२३). श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हा पोलीस दलाने जिल्ह्यातील विविध उपविभागीय अधिकाऱ्यांकडे पाठवलेले हद्दपारीचे १०० प्रस्ताव बऱ्याच कालावधी पासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही. सद्यस्थितीत जळगाव जिल्ह्यामध्ये ३६ हद्दपारीचे प्रस्ताव झाले असून १० प्रस्तावांवर अंतिम निर्णय घेण्यात आला आहे. उर्वरित प्रलंबित २६ प्रस्तावापैकी १६ प्रस्ताव हे उपविभागीय पोलिस अधिकारी यांच्या स्तरावर चौकशीकामी प्रलंबित आहेत. त्यांच्याकडून चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर उपविभागीय दंडाधिकारी यांच्या स्तरावर सुनावणी घेऊन अंतिम आदेश निर्गत करण्यात दक्षता घेण्यात येत

आहे. तसेच, सध्या उपविभागीय दंडाधिकारी स्तरावर १० प्रस्ताव प्रलंबित असून प्रलंबित हद्दपार प्रस्तावामध्ये तातडीने अंतिम आदेश पारित करण्याबाबत जिल्हादंडाधिकारी, जळगाव यांनी जिल्ह्यातील सर्व उपविभागीय दंडाधिकारी यांना निर्देश दिले आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव – १ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.